Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# संगितातील - वाद्य - उत्पति आणि विकास

**प्रा. डॉ. थाडेष्वर सं. मदनकर**
सहाय्यक प्राध्यापक (संगीत विभाग)
सेवादल महिला महाविदयाल, नागपूर
मेल – tmadankar9@gmail.com

---

ज्या कलेतं स्वर और लय या मूलभुत घटकांव्दारे एक अलौकिक भावविष्व अथवा रसोत्पत्ति केली जाते. त्यास संगीतकला असे म्हणतात. संगीत ही नादाश्रित कला आहे आणि नाद हा ध्वनीचाच एक विशिष्ट गुणधर्म असलेला प्रकार आहे. अर्थात संगीत ही एक ध्वनीसंबंधित घटना आहे. ध्वनी सांगितीक ठरण्यासाठी त्याला एक विषिष्ट रुप, आकार दयावा लागतो की त्यामुळे तो ध्वनी सांगितीक ठरु शकेल आणि त्या ध्वनीचे रुपांतर नादात होईल.

'गीत' वाद्यंच नृत्यंच त्रय संगीतमुच्यते म्हणजे गायन, वादन, आणि नृत्य हे तिन्ही मिळून संगिताची व्याख्या केली आहे. आपल्या मनाला अतिषय आनंद देतांना आपले अवघे जीवन सुरेल करण्याला संगीत कलेची उत्पत्ती कषी झाली असावी व पुढे तिला आजची प्रगत अवस्था प्राप्त होईपर्यंत विकासाच्या कोणकोणत्या टप्प्यातुन जावे लागले असावे याबद्दल कुतुहलच वाटते. आपण संगिताचा उगम शोधु लागलो तर आपणास मानवाच्या संस्कृतीच्या उमगाचाच शोध घ्यावा लागेल.

ततं येनावनद्धं च भुवनं निजमायया।
आनन्दधन मध्येमि तं ब्रह्मसुषिरे हरम् ।।१।।

आदिकालापासून मानव विचार आणि भावना अभिव्यक्तीसाठी प्रयत्न करीत आहे. भाषा आणि कलांची निर्मिती आणि विकास याच प्रयत्नांचे फल होय. जीव विज्ञानाच्या अभ्यासावरूनच कळते की, भाषा उत्पत्ती पूर्वीच संगीताची निर्मिती झालेली होती. भारतीय समाज आणि संस्कृती धर्मप्रधान आहे. आपण भारतीय संस्कृतीच्या कोणत्याही अंगाचा अभ्यास केला तरी तो भाग धर्म निगडितच आहे असे लक्षात येईल. भारतीय विचारधारांनी प्रभावित झाल्याविना संगीतही राहिले नाही. संगीताचे पूर्वीचे (भूतकालीन) विद्वान, संगीत विज्ञानतज्ज्ञ यांनी संगीतास नाद वेद नाव दिले आणि उत्पत्ती सृष्टिकर्ता ब्रह्मा आहे असे म्हटले आहे. ही विद्या ब्रह्माकडून शिव, सरस्वती, नारद यांच्यापर्यंत आली. आणि त्यांनी पुढे यक्ष, किन्नर, अप्सरांना ही विद्या दिली. त्यानंतर भरत आदि ऋषींनी ही विद्या ग्रहण केली आणि मनुष्यापर्यंतु विद्या पोहचवली. भारतीय संगीतामध्ये वाद्यांचे तत, अवन्द्ध, सुषिर आणि घन या चार वर्गात (विभागामध्ये) विभाजन केले आहे. या चार प्रकारच्या वाद्याबद्दल (वाद्यासंबंधी) असे म्हटले आहे.

ततं वाद्यंतु देवानां गंधर्वाणां च शौषिरम् ।
आनद्ध राक्षसानांतु किन्नराणां घनं विदुः।
निजावतारे गोविंदः सर्वमेवानयत क्षितौ।

म्हणजे तत् वाद्य देवतांशी, सुषिर गंधर्वांशी, आनद्ध राक्षसांशी आणि घन किन्नरांशी संबंधित होते. श्रीकृष्णाने अवतार घेतला. त्यांनी चारी प्रकारांच्या वाद्यास पृथ्वीवर आणले. कल्लिनाथच्या मते दक्ष यज्ञ विध्वंसामुळे शिवास क्रोध झाला. तो क्रोध शांत होण्यासाठी स्वाती, नारद आदि ऋषींनी वाद्यांची निर्मिती केली. शिवपुराणातील एका कथानुसार शिवाने पार्वतीची शयनमुद्रा पाहिली आणि त्याआधारे वीणेची निर्मिती केली. तीच रूद्रवीणा होय !

प्राचीन ग्रंथात मृदंगादि अवनद्ध वाद्यउत्पत्ती संबंधी अनेक स्पष्टीकरणे मिळतात. जैन मतानुसार मुरज नावाच्या वाद्याचा शोध शकनिधींनी लावला.

मुरजास्तु मते जैने जगतः शंखान्महानिधेः ।

दुसऱ्या एकाने म्हटले आहे की, शिवाने त्रिपुरासुरावर विजय प्राप्त झाल्यावर जे नृत्य केले त्यास साथ देण्यासाठी ब्रह्माने अवनद्ध वाद्यनिर्मिती केली. त्या वाद्याचा आधार (पाया) मातीच होती. म्हणून त्यास मृदंग म्हटले जाते. (आजसुद्धा अवनद्ध श्रेणीतील काही वाद्ये डावीकडील डग्गा मातीचाच असतो.) शिवपुत्र गणेश याने सर्वप्रथम हे वाद्य वाजवले होते. पानांवर पाण्याचे थेंब पडले त्या संबंधातही एक कथा आहे ही कथा नारद आणि स्वाती या ऋषीसंबंधित आहे. ह्या ऋषिनाच भरताच्या 'नाट्यशास्त्र' तील तेहतीसाव्या अध्यायामध्ये वाद्यसंबंधित ग्रंथाचा कर्ता मानले आहे. या कथेनुसार असे घडले — एके दिवशी स्वाती आपल्या आश्रमातून पाणी आणण्यासाठी एका सरोवराकडे गेले. योगायोगाने त्यावेळी पाऊस पडत होता. पावसाचे थेंब प्रथम मंदगतीने नंतर जलद गतीने सरोवरातील उमललेल्या कमळांच्या छोट्या मोठ्या पाकळ्यांवर पडू लागले. हे होत असताना अनेक प्रकारच्या ध्वनींची निर्मिती झाली. स्वातीस हे ध्वनी कर्णमधुर वाटले. ह्या त्यांच्या स्वरूपास त्यांनी मस्तिष्कात ग्रहण केले. (लक्षात ठेवले.) ते आश्रमात परत आले. आल्यावर त्यांनी विश्वकर्मास हा वृत्तांत सांगितला. आणि असे वाद्य निर्माण करा की पावसातील ध्वनीप्रमाणेच ते असतील असे सांगितले. विश्वकर्माच्या प्रयत्नाने जे वाद्य तयार झाले त्यास 'पुष्कर' म्हटले गेले. ह्या वाद्याचे मूळ शरीर मातीचे होते. नंतर या वाद्याच्या आधारावरच लाकूड, धातूंचा उपयोग करून मृदंग, बटह, दर्दुर असे अवनद्ध वाद्य तयार झाले.

वीणा तसेच मुरज शिवाय डमरू नावाच्या अवनद्ध वाद्यांशी 'शिव' जींचा संबंध आहे. याशिवाय 'बनारस घराणे' वाले शहनाई वादक शहनाईची निर्मिती शिवाच्या वाद्यशृंगातून वाद्यशिंगातून झाली असे मान्य करतात. त्यांच्या मतानुसार या वाद्याचे सर्वप्रथम वादन शिव—पार्वतीच्या लग्नाच्या शुभमुहूर्तावर झाले. तसं पाहिले तर आजसुद्धा शहनाई वाद्यास मंगलवाद्य मानले जाते. आणि विवाहासारख्या शुभवेळी त्याचे (शहनाई सनईचे) वादन होते. प्रकृतीचे (निसर्गाचे) मूल रूप लयी (Rythm) मध्ये प्रकट होते. लयीमुळे संपूर्ण जग प्रभावित झाले आहे. आदिवासी जातीतील लोकांचे लक्ष लयीवरच केंद्रित होणे ही नैसर्गिक प्रक्रियाच होय. संपूर्ण विश्वात संगीत विकासाचे प्रथम चरण (प्रारंभ) 'लय' च आहे. अगदी सुरूवातीच्या काळातसुद्धा मानवाने ष्लयीष मध्ये रूचि दाखवली, आणि म्हणूनच उड्या मारणाऱ्या, पळणाऱ्या जनावरांचे अनुकरण मानवाने आपल्या नृत्यात केले. कालांतराने या नृत्यास सुव्यवस्थित लय (गती) देण्याच्या गरजेतूनच वाद्य—संगीताचा जन्म झाला.

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

नृत्याच्या साधन रूपात घुंगरूचा शोध लागला असावा. आणि ह्याच ष्युंगरूष स घन वाद्यान्तर्गत स्थान दिलं गेलं. घुंगरूशी मिळते जुळते वाद्य इतर देशातही प्रचलित आहे. नर्तक नर्तिका आपल्या शरीरावर अवयवावर हात, पाय, कंबर, मस्तक तसेच आपल्या वस्त्रामध्ये आणि वाद्यामध्ये हे घुंगरू बांधून घेत. घुंगरूचा जन्म निश्चित एखाद्या वाळलेल्या शेंगातून झाला असावा. वाळलेल्या शेंगा फिरवल्या की आतील दाणे आवाज करतात. प्राचीन काळात नृत्यात रमलेल्या एखाद्या व्यक्तीचा पाय किंवा हात एखाद्या वाळलेल्या शेंगेवर पडला असावा शेंगेवर आघात झाला असावा. त्यातून निघालेल्या ध्वनीमुळे ती व्यक्ती मोहित (मुग्ध) होऊन त्याचा वापर वाद्यात केला असेल असा माझा अंदाज आहे. कदाचित असंही झालं असेल पिक बहरले असताना आनंदी होऊन व्यक्ती शेतातील डोलणाऱ्या पिकामध्ये नाचत असेल, तेंव्हा वाळलेल्या शेंगा त्या व्यक्तीच्या शरीर धक्क्याने वाजल्या असतील, किंवा पिकं कापल्यावर त्याचा थरथरता पाय अशाच काही वाळलेल्या शेंगेवर पडून त्या शेंगेतून ध्वनी निघाला असणार. काही देशात आजही पौप (Papua) आणि न्यूगिनी (New Guine) निवासी एक विशिष्ट प्रकारच्या वाळलेल्या शेंगांच्या घोसास दोरीत बांधून (गुंतवून) विविध रंगाने घोस रंगवतात आणि नृत्यात त्याचा उपयोग करतात त्यास 'टेरेको' म्हणतात.

घुंगरूशी साम्य असणारे एक वाद्य आहे, भारतात त्याला छुमछुम म्हणतात. त्याच्या समान पाश्चात्य वाद्य मरक्काज आणि कास्टानेट (Marccas and castonat) आहे. ह्याचाही विकास एखाद्या वाळक्या शेंगा फळावरच आधारित असेल, ह्या वाळक्या शेंगा हातात घेऊन वाजवल्या जात असतील. अवनद्ध आणि घनवाद्याशिवाय सुषिर आणि ततश्रेणीचे वाद्य सुद्धा नैसर्गिक ध्वनींच्या अनुकरण करणाऱ्या प्रयत्नानेच उत्पन्न झालेले आहेत. सुषिर वाद्याची सुरूवात वेळूच्या खोडातूनच झाली आहे. कधी कधी वेळूच्या बनात हवा वाहिली तर मधुर आवाज उत्पन्न होतो. जंगलात राहणाऱ्या आदि मानवाने या प्रेरणेतूनच फुंकून वाद्यरचना केली असेल. सुषिरवाद्यात आपणास बासरी विकसित रूपात दिसते. वेणु, मुरली, बासरी अशा लोकप्रिय नावाने ओळखली जाते. नैसर्गिक रूपात जंगलातील वेळूत किडा किंवा भुंग्यांनी केलेल्या छिद्रातून स्वर उत्पत्तीची कल्पना कवि कालिदासाने केली होती. ही कल्पना कोणत्याही काळी केलेली असो त्याचे मूलरूप आदिकाळात असणार. निसर्गाच्या ह्याच शिक्षण पध्दतीने वेळूमधील छिद्रात फुंकून स्वर उत्पत्ती करण्यास मनुष्यास शिकायला मिळाले. आणि त्याचेच फलस्वरूप आहे बासरी ! त्यानंतर बोटांच्या सहाय्याने वेळूतील छिद्रावर दाब देऊन छिद्राच्या वायुवर (वातावर) संतुलन ठेऊन त्याद्वारे स्वरातील चढ उतार उत्पन्न करणे ही एक महत्त्वपूर्ण ज्ञानप्राप्तीच होती. त्यानंतर पिपाणीचा शोध लागला. आजसुध्दा मुले निंबाची किंवा पिंपळाची दोन पाने एकत्र करून फुंकून आवाज निर्माण करतात. हे सर्व न शिकवताच होत असतं. ही निर्मिती सनई, नागस्वराच्या उत्पत्तीस कारणीभूत ठरली. सुषिर वाद्यश्रेणीत एक वाद्य पैन पाईप्स (च्ंद च्पचमे) आहे. विविध देशात निरनिराळ्या नावांनी हे ओळखले जाते. उदा. न्यूगिनी (New Guinea) मध्ये इविलिका, प्राचीन ग्रीसवासी त्यास साईरिंक्स (Syrinx) नाव देतात. त्यांच्या पौराणिक कथेनुसार साईरिंक्स नावाची एक सुंदरी होती. Pan (एक ग्रीक देवता) तिच्यावर प्रेम करत होता. पण हे साईरिंक्सला मान्य नव्हतं. त्याच्या प्रेमनिवेदनापासून बचाव करण्यासाठी आपल्या बहिणीच्या मदतीने तीच झुडुपात परिवर्तित झाली. पॅनने त्या वेताच्या रोपट्याचे छोटे

छोटे तुकडे केले आणि क्रमाक्रमाने ते तुकडे जोडले एकसंघ केले. ह्याच वाद्यावर तो असफल प्रेम स्मृतीतील करूण असे ध्वनि वाजवत असे. करूणस्वर छेडीत असे.

ततवाद्याच्या शोधात आदि मानवाची शिकार आणि युध्दाची गरज सहाय्यभूत झालेले स्पष्ट दिसते. तंत्र बाद्यशोधामध्ये आदि मानवाच्या धनुष्यास वाद्याचा जनकच म्हणता येईल. सर एडवर्ड बी. टेलरने आपल्या पुस्तकात (एनथ्रोपोलाजीमध्ये) या गोष्टीस पुष्टी दिलेली आहे. प्रारंभिक तंत्र वाद्य धनुषाकार असण्याचे कारणही हेच आहे. शिकार केल्यावर, थकवा आल्यावर मनोरंजनासाठी त्याने धनुष्याची प्रत्यंचा वाजवून आपला थकवा दूर करण्याचा प्रयत्न केला असावा, याच धनुष्य टणत्काराने त्यास बाद्ययंत्र निर्मितीची प्रेरणा दिली. त्यामुळेच तर स्वरांचे प्रारंभिक ज्ञान प्राप्त होत गेले. जेव्हा शिकाऱ्याचा धनुष्यातून बाण सुटत होता तेव्हा एक झनझन मिश्रित ध्वनीचा आभास होत असे. हे ही शक्य आहे की, तारांच्या वेगवेगळ्या उंचीमध्ये विविध विभिन्न स्वरांचे चढउतार आरोह अवरोहाचे दर्शन झाले असेल. तेच स्वरमण्डलासारख्या वाद्य निर्मितीचे कारण ठरले. प्राचीन भारतात प्रचलित असणाऱ्या पिनारू नावाच्या एका तंत्रवाद्याचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी झालेला आहे. त्यावर एकच तार असे. बोटांनी छेडून ते वाजवले जात असे. याचा शोध शिवाने केला असं म्हटलं जातं. (पिनाक शिवधनुष्याचे नाव असलेले सांगितले जातेच.) वाद्यांच्या आधारे नवनवीन वाद्यांची निर्मिती आणि विकास वेळोवेळी होतच गेला. यासाठी दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. पहिली गोष्ट ही की, काल आणि परिवर्तनाबरोबरच अनेक वाद्यस्वरूपात परिवर्तन झाले. त्यामुळेच तर काही नवी वाद्ये प्रकट झाली. दुसरे असे की, काही वाद्ये काही काळपर्यंत वाजत राहिली तर त्याचे दोष दृष्टीगत झाले. दोष कळले. त्या दोषांना दूर करण्यासाठी त्यांच्या स्वरूपात आवष्यक संशोधन किंवा परिवर्तन केले गेले आणि त्यातूनच काही नवीन वाद्यांची निर्मिती झाली. या दोन कारणांशिवाय आणखी एक कारण आहे की मानवाच्या मेंदूची गति शीलता. या गतिशीलतेमुळेच तो सतत काही ना काही तरी नाविन्याचा शोध घेत असतो आणि प्रयोग करत असतो. याच प्रवृत्तीने वाद्य उत्पत्ती आणि विकासात योगदान दिलेले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर बाण नावाची प्राचीन वीणा, ह्यात शंभर तारा होत्या. पलाशाच्या काडीने त्यावर आघात करून (छेडून) ही वीणा वाजवली जात होती. नंतर संतूर (काश्मिरमधील लोकप्रिय वाद्य) डलसीमर (क्नसबपउमत) झाली. याच डलसीमरने पाश्चात्य देशात पियानो फोर्ट (च्पंदव वितजम) चे रूप धारण केले. (कात्यायनी या शततंत्री वीणेतही शंभर तारा होत्या.) त्यास संतूरचे पूर्वज मानले गेले.

एकवीस तारांची मत्तकोकिला वीणाधारित स्वरमंडलाची रचना झाली. त्याचप्रमाणे अलाबू वीणाधारित आजचे प्रचलित ड्रोन इंस्ट्रुमेंट (क्तवदम प्देजतनउमदज) तंबोरा तानपुऱ्याची निर्मिती झाली. सरोद, रबाब, सतार इ. वाद्ये प्राचीन वीणेची संशोधित आणि बदललेली रूपे आहेत. काही दिवसापूर्वी सतारीच्या शोधाचे श्रेय अमीर खुसरोस दिले जात होते. पण आता सतारीची उत्पत्ती भारतीय आहे हे सिद्ध झालेले आहे. सतार प्रवर्तक खुसरो नाही. डॉ. लालमणि मिश्रांनी सतारीची रचना आणि वादन शैली संबंधित वैशिष्ट्यावर आधारित असे सिद्ध केले की सतार एक भारतीय वाद्यच आहे. तबला निर्मिती आणि विकास यासंबंधी काही मतांचे प्रतिपादन केले. सर्वांचे विवेचन करणे येथे संभव नाही. एका मतानुसार भारतात पौराणिक कालात दोन भिन्न ध्वनींचे नगारा वादन होत असे त्यास संबल म्हणत असे. त्यापैकी एकास नर दुसऱ्यास

मादी म्हटले आहे तबल्याच्या जोडीच्या निर्मितीचा आधार हेच असण्याचीही शक्यता आहे. काही लेखकांनी म्हटले आहे की, तबला निर्मिती मृदंग किंवा पखवाज दोन भागात विभक्त झाल्यामुळेच झाली आहे. असं म्हणतात की पूर्वी तबला सुद्धा मृदंगाप्रमाणेच मोकळेपणाने हातांनीच वाजवला जात होता. त्यात डावीकडच्या बाजूस शाई लावली जात नसे. पण कणिक लावली जात असे. एकदा सिद्धारास दिल्लीमध्ये एकाने संगीत स्पर्धेमध्ये पराभूत केले कारण तो ढोलकं वाजवत होता ते मुक्त हस्ताने ढोलाचे बोल निघत नव्हते. सिद्धार खानने डावीकडच्या भागाची कणीक काढून उजव्या बाजूप्रमाणे शाई लावली, आणि ढोलकीतील सर्व बोल निघत गेले. त्यांनी पुन्हा वादकास स्पर्धेस बोलावले आणि त्याचा पराभव केला. या नव्या परिवर्तनाचे स्वागत झाले आणि इतर वादकांनीही हे स्वीकारले, कारण त्यामुळे बंद बोल तबल्यातून निघू लागले. या बंद बोलीच्या कारणानेच तबल्याचे स्वतंत्र व्यक्तित्व घडत गेले.

मध्यकाळात काही वाजंत्र्याचा विकास असा झाला. ततश्रेणीतील एक वाद्य आहे सुरसिंगार ! ह्याच्या उत्पत्तीसंबंधी एक मनोरंजक घटना सांगितली जाते, ती अशी की एकदा बनारसच्या राजदरबारात संगीत संवादांचे नियोजन झाले. त्यात तानसेन वंशज जफर रबाब आणि निर्मल शाह वीणा कार्यक्रम सादर करणार होते. प्रथम निर्मल शाहने वीणा वादन सादर केले. त्यानंतर जफर खाँ रबाब बादनासाठी आले परंतु वर्षा ऋतुमुळे त्यांच्या वाद्याचे चामडे ओलसर होऊन ते नीट वाजवू शकले नाहीत. त्यांनी बनारसच्या राजास एक महिन्याची मुदत मागितली. ते एका वाद्य निर्मात्याकडे गेले. रबाब प्रमाणेच वाद्य तयार करवून घेतले. पण त्यावरील चामड्याऐवजी धातूचे आच्छादन केले. त्यात सर्व तारा धातूंच्याच केल्या. याचा आवाज पहिल्यापेक्षा अधिक चांगला झाला. अशा नवीन वाद्यावर म्हणजे 'सुरसिंगार' वर कार्यक्रम सादर केला. तो यशस्वी झाला. या वाद्यांमध्ये वीणा आणि रबाब दोन्ही शैलीचा वापर कुशलतेने केला जाऊ शकत होता. इसराज आणि दिलरुबा वाद्यांची निर्मिती सुद्धा मध्यकाळातच झाली. या वाद्यांचा खालचा भाग सारंगीप्रमाणे आणि वरचा भाग एखाद्या छोट्या सतारीप्रमाणे असतो. यास एखाद्या कांडीने वाजवता येते. या दोन्हीतील फरक म्हणजे दिलरूबाचा आकार इसराजपेक्षा थोडासा मोठा असतो.

यावरून आम्हास असे लक्षात येते की, वाद्यांच्या उत्त्पत्तीचा इतिहास हाच मानवाच्या संस्कृतीचा आणि सभ्यतेचा खरा इतिहास होय. वाद्य स्वरूपातील नवे संशोधन आणि परिवर्तन हे मानवाच्या बौध्दिक उन्नतीचा आणि शिल्पमय उन्नतीचे परिचय देत असतात. आधुनिक काळातील विदेशी संबंध असल्यामुळे जी प्रचलित वाद्ये भारतात आली (उदा. व्हायोलिन,

हारमोनियम, पियानो, क्लारनेट इ. ती सोडली तर बाकीची वाद्ये प्राचीन काळापासून

आजपर्यंत अगदी त्यांच्या मूल स्वरूपातून आज अस्तित्वात आहेत. (उदा. बासरी, वीणांचे काही प्रकार) पण काही बदललेल्या स्वरूपातही काही वाद्ये आज प्रचलित आहेत. (उदा. तबला. सतार इ.)

संशोधन किंवा परिवर्तन केले गेले आणि त्यातूनच काही नवीन वाद्यांची निर्मिती झाली. या दोन कारणांशिवाय आणखी एक कारण आहे की मानवाच्या मेंदूची गति शीलता. या

गतिशीलतेमुळेच तो सतत काही ना काही तरी नाविन्याचा शोध घेत असतो आणि प्रयोग करत असतो. याच प्रवृत्तीने वाद्य उत्पत्ती आणि विकासात योगदान दिलेले आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर बाण नावाची प्राचीन वीणा, ह्यात शंभर तारा होत्या. पलाशाच्या काडीने त्यावर आघात करून (छेडून) ही वीणा वाजवली जात होती. नंतर संतूर (काश्मिरमधील लोकप्रिय वाद्य) डलसीमर (क्नसबपउमत) झाली. याच डलसीमरने पाश्चात्य देशात पियानो फोर्ट (Piano forte) चे रूप धारण केले. (कात्यायनी या शततंत्री वीणेतही शंभर तारा होत्या.) त्यास संतूरचे पूर्वज मानले गेले.

एकवीस तारांची मत्तकोकिला वीणाधारित स्वरमंडलाची रचना झाली. त्याचप्रमाणे अलाबू वीणाधारित आजचे प्रचलित ड्रोन इंस्ट्रुमेंट (Drone Instrument) तंबोरा तानपुऱ्याची निर्मिती झाली.

सरोद, रबाब, सतार इ. वाद्ये प्राचीन वीणेची संशोधित आणि बदललेली रूपे आहेत. काही दिवसापूर्वी सतारीच्या शोधाचे श्रेय अमीर खुसरोस दिले जात होते. पण आता सतारीची उत्पत्ती भारतीय आहे हे सिद्ध झालेले आहे. सतार प्रवर्तक खुसरो नाही. डॉ. लालमणि मिश्रांनी सतारीची रचना आणि वादन शैली संबंधित वैशिष्ट्यावर आधारित असे सिद्ध केले की सतार एक भारतीय वाद्यच आहे.

तबला निर्मिती आणि विकास यासंबंधी काही मतांचे प्रतिपादन केले. सर्वांचे विवेचन करणे येथे संभव नाही. एका मतानुसार भारतात पौराणिक कालात दोन भिन्न ध्वनींचे नगारा वादन होत असे त्यास संबल म्हणत असे. त्यापैकी एकास नर दुसऱ्यास मादी म्हटले आहे तबल्याच्या जोडीच्या निर्मितीचा आधार हेच असण्याचीही शक्यता आहे. काही लेखकांनी म्हटले आहे की, तबला निर्मिती मृदंग किंवा पखवाज दोन भागात विभक्त झाल्यामुळेच झाली आहे. असं म्हणतात की पूर्वी तबला सुद्धा मृदंगाप्रमाणेच मोकळेपणाने हातांनीच वाजवला जात होता. त्यात डावीकडच्या बाजूस शाई लावली जात नसे. पण कणिक लावली जात असे. एकदा सिद्धारास दिल्लीमध्ये एकाने संगीत स्पर्धेमध्ये पराभूत केले कारण तो ढोलकं वाजवत होता ते मुक्त हस्ताने ढोलाचे बोल निघत नव्हते. सिद्धार खानने डावीकडच्या भागाची कणीक काढून उजव्या बाजूप्रमाणे शाई लावली, आणि ढोलकीतील सर्व बोल निघत गेले. त्यांनी पुन्हा वादकास स्पर्धेस बोलावले आणि त्याचा पराभव केला. या नव्या परिवर्तनाचे स्वागत झाले आणि इतर वादकांनीही हे स्वीकारले, कारण त्यामुळे बंद बोल तबल्यातून निघू लागले. या बंद बोलीच्या कारणानेच तबल्याचे स्वतंत्र व्यक्तित्व घडत गेले. मध्यकाळात काही वाजत्र्यांचा विकास असा झाला. ततश्रेणीतील एक वाद्य आहे सुरसिंगार

ह्याच्या उत्पत्तीसंबंधी एक मनोरंजक घटना सांगितली जाते, ती अशी की

**संदर्भ ग्रंथसुची :**

- रागदारी संगीतातील सौदर्यस्थळे – रोचना भडकमकर
- संगीत कला विहार – गांधर्व महाविदयालय मंडळ